**विशेष लेख क्र.१३३** २३ श्रावण १९२९ शके (सायं.५.३० वा.)
**भाग - २** मंगळवार, दि. १४ ऑगस्ट २००७

# तंटामुक्ती :समृद्धीची शक्ती

पूर्वापार खेड्यांमध्ये पंच पद्धती अस्तित्वात होती. इंग्रजांच्या आगमनानंतर या पद्धतीला तडा गेला. साम्राज्यवादी इंग्रजांनी संपूर्ण राज्य एकछत्राखाली आणून त्यांना पोषक ठरेल असेच वातावरण निर्माण केले. गावा-गावात महसूल गोळा करण्याचे काम पाटलांकडे असायचे. गावगाड्याचा हिशोब कुळकर्णींकडे असायचा. भांडण-तंटे मिटविण्यासाठी गावातील वडीलधारी मंडळ पंच असायची. गावात बारा बलुतेदार, अठरा-अलुतेदार गुण्यागोविंदाने नांदत होते. गाव स्वंयपूर्ण होते. कच्चा मालाची लुट करून पक्का माल विकण्यासाठी बाजारपेठा काबीज करण्याचा व्यापारी हेतू असल्यामुळे ब्रिटिशांनी असा हा गावगाडा मोडीत काढाला. गावचा कारभार नोकरशाही हाकायला लागली आणि गावाचा साचा कोसळला. छोट्या-मोठे भांडण कोर्ट-कचेऱ्यात जाऊ लागली. हे प्रमाण दिवसें-दिवस वाढत गेले. परिणामी यंत्रणा अपुरी पडू लागली. लाखो दावे प्रलंबित राहू लागले, म्हणूनच महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री आर.आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेची सुरूवात १५ ऑगस्ट पासून सुरू होत आहे. त्या अनुषंगाने तंटामुक्त गाव मोहीम व बक्षीस योजनेसंबंधी सविस्तर माहिती गावोगाव पोहोचावी यासाठी या मोहिमेचा सविस्तर आढावा देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

गावपातळीवर छोट्या-छोट्या कारणावरून निर्माण होणाऱ्या तंट्यांचे पर्यावसन मोठ्या तंट्यात होऊ न देणे, तसेच वादामध्ये मालमत्ता अडकून पडून त्यातून आर्थिक नुकसान होऊ न देणे व कुटूंबाची, समाजाची व गावाची शांतता धोक्यात येऊ नये, यासाठी तंटे निर्माण होणार नाहीत व अस्तित्वातील तंटे लोकसहभागाने, समोपचाराने व आवश्यक तेथे प्रशासनाची मदत घेऊन सोडविण्याची व्यवस्था गावपातळीवर निर्माण व्हावी, यासाठी शासन **महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम** सुरू करीत आहे.

या मोहिमेंतर्गत प्रतिबंधात्मक उपाययोजना, दाखल झालेले तंटे मिटविणे व नव्याने निर्माण होणारे तंटे मिटविणे, असे या मोहिमेचे तीन भाग असून या तीनही भागातील कार्यवाही व तंटे मिटविण्याची मोहीम ही लोकचळवळ म्हणून राबविली जाणार आहे. महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचे स्वरूप कसे राहील? मुल्यमापनाचे निकष कोणते? मुल्यमापनाची यंत्रणा कशी? पुरस्कार योजनेचे स्वरुप कसे? याबाबत सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे आहे.

२..

**महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेचे उद्दिष्टे :-**

१. गावपातळीवर तंटे निर्माण होऊ नयेत, म्हणून उपक्रम राबविणे.

२. दाखल असलेल्या व नव्याने निर्माण होणाऱ्या तंट्यांचे निराकरण करून ते कमी करणे.

३. गावासाठी गावातच लोकसहभागातून तत्काळ व सर्वमान्य तडजोड घडवून आणण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे.

४. गावातील जनतेमध्ये जातीय व धार्मिक सलोखा, सामाजिक व राजकीय सामंजस्य आणि सुरक्षिततेची भावना निर्माण करणे.

५. पोलिसांच्या कामामध्ये पारदर्शकता आणून त्यांची जनमानसातील प्रतिमा सुधारणे व जनतेचे सेवक अशी प्रतिष्ठा प्राप्त करून देणे.

६. लोकांच्या सहकार्याने अवैध धंद्यांना प्रतिबंध करणे व त्यांचे निर्मुलन करणे.

७. भ्रष्टाचार व भ्रष्टाचारीप्रवृत्ती कमी करण्यासाठी गाव पातळीवर प्रयत्न करणे.

८. अनिष्ट प्रथा व चालीरीती नष्ट करण्यासाठी लोकांच्यामध्ये जागृती निर्माण करणे.

या उद्दिष्टांभोवती ही संपूर्ण मोहीम असणार आहे. ७०० वर्षांची भागवत परंपरा असलेल्या महाराष्ट्रात आजच्या घडीलाही तंटे नसलेले गावातील तंटे-गावातच मिटविण्याची परंपरा असलेले काही गावे आहेत. पण त्यांचं प्रमाण अगदी नगण्य असेच आहे. पण ही परंपरा मोडीत निघून फार वर्षे झाले नाहीत. मागची पिढी पंचपरमेश्वरांचा निवाडा ऐकतच मोठी झाली आहे. आता त्याच पिढीला हे शिवधनुष्य पेलायचं आहे. या मोहिमेसाठी कुठला खर्च असणार नाही, कोणाच्या खिशाला कात्री लागणार नाही. फक्त सुसंवादतून ही परिवर्तनाची मोहीम राबवायची आहे.

**-- युवराज पाटील**
सहायक संचालक, मंत्रालय

००००